## ६. लागवड व कलम करणे

थंडी संपते अशा वेळी (फेब्रुवारी महिना) खुंटरोपाची लागवड करावी. लागवडीच्या २-३ दिवसापूर्वी झाकलेल्या चारीमध्ये हलकीशी नाळ करून पाणी द्यावे. त्यानंतर जमीन वाफशामध्ये आल्यानंतर १'×१'×१' आकाराचे लहान खड्डे लागवडीच्या निर्धारित जागेवर घ्यावेत व त्यामध्ये कुजलेले शेणखत व थोडीफार वाळू टाकावी. याच सोबत किटकनाशकाची १ चमचा भुकटी टाकल्यास वाळवीपासुन रोपांचा बचाव करता येईल व वाळू आणि शेणखतामुळे मुळांचा चांगला विकास होण्यास मदत होईल.



खुंटरोपाचा रि-कट घेणे

फेब्रुवारी महिन्यात लागवड केलेली रोपे जवळपास मे महिन्यापर्यंत तशीच वाढू द्यावीत. यामुळे वरचा विस्तार जेवढा वाढेल तितका जमीनीत मुळांचा विकास होईल.



खुंटकाडीवर कलम करणे

जमीनीत मुळांचा विकास व विस्तार चांगला झाल्यास लागवडीच्या ५० दिवसानंतर रि-कट घेऊन पुन्हा निघालेल्या सरळ, सशक्त व रोग तसेच किडमुक्त २-३ फूटी निवडून बांबूला बांधून घ्याव्यात व बाकीच्या फूटी काढून टाकाव्यात.

- कलम हे खुंटकाडीवर जमीनीपासून सव्वा ते दिड फुटावर ८ ते १० मि.मी. जाडीच्या काडीवर केले जाते. तेव्हा ही जाडी मिळण्याकरीता खुंटकाडीच्या बगलफुटी टप्प्या टप्प्यात कमी कराव्यात.
- वातावरणात जेव्हा जास्त तापमान (३०-३५ सें.ग्रे.) व आर्द्रता ८०% च्या पुढे असते अशावेळी कलम यशस्वी होते. ही परिस्थिती ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यात अनुभवास येते. तेव्हा, कलम यशस्वी होण्याकरीता खालील उपाययोजना कराव्यात.

१. निवडलेली सायन काडी ही भरपूर उत्पादन देणाऱ्या सशक्त, रोग व किडमुक्त वेलीपासून असावी.

२. निवडलेली सायन काडी ही परिपक्व असावी तसेच खुंटकाडीसुध्दा रसरशीत असावी.

३. निवडलेली काडी ही कलम करण्यापूर्वी १-२ तास कार्बेन्डाझीमच्या द्रावणात बुडवलेली असावी.

४. कलम करतेवेळी सायन काडीला २ इंच तिरका काप घ्यावा.

५. कलम जोड २०० मायक्रॉनच्या जाडीचे प्लॅस्टिक वापरून घट्ट बांधावा.

- कलम केल्यानंतर १०-१२ दिवसानंतर डोळे फुटण्यास सुरवात होते व कलम जोड ४५ दिवसात भरून येतो. जसजसा कलम जोड फुगतो तसतशी प्लॅस्टिकची पट्टी त्यामध्ये अडकते. कालांतराने मोठी खाच त्यामध्ये पडुन कलम केलेली वेल वाया जाऊ शकते. तेव्हा ३० दिवसानंतर ती पट्टी कापून पुन्हा बांधावी.
- नविन फूट ही पावसाळी वातावरणात येत असल्यामुळे त्यावर विविध प्रकारच्या रोग व किडीचा प्रादुर्भाव दिसतो. तेव्हा, प्रभावी उपाययोजना कराव्यात.
- कलम पुर्णपणे यशस्वी होण्याकरीता कलम जोडाच्या खाली निघालेल्या फूटी वेळोवेळी काढून टाकाव्यात.



कलम यशस्वी झालेली वेल


**विस्तार माहिती पत्रिका क्रं. : ३२**

**तांत्रिक माहिती :**
डॉ. आर. जी. सोमकुंवर, प्रमुख शास्त्रज्ञ (उद्यानविद्या)
राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र, पुणे - ४१२ ३०७

**प्रकाशक :**
डॉ. पी. जी. अडसूळे, संचलक, राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र, पुणे - ४१२ ३०७

**जानेवारी : २०१०** **किमंत : रू. १०**

**अधिक माहितीकरता संपर्क :**
**संचालक, राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र**
पो. बॉ. क्रं. ३, मांजरी फार्म पोस्ट, सोलापूर रोड, पुणे-४१२ ३०७. महाराष्ट्र (भारत)
फोन : ०२०-२६९१४२४५/५५७३/५५७४ • फॅक्स : ०२०-२६९१४२४६
ईमेल : dirnrcg@gmail.com • वेबसाईट : http://nrcgrape.nic.in

Printed at : Flamingo Business Systems, Tel. : 24214636. Email : flaminbs@vsnl.com



Extension Folder No. 32


भाकृअनुप
ICAR

# द्राक्ष लागवड कशी करावी



रा.द्रा.अनु.के.
NRCG


**राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र, पुणे**
पो. बॉ. नं. 3, मांजरी फार्म पो. ऑ., सोलापूर रोड,
पुणे - 412 307. महाराष्ट्र (भारत)

महाराष्ट्र राज्यात द्राक्षपीक हे अती महत्वाचे फळपीक समजले जाते. राज्यात या पीकाचे क्षेत्र नाशिक, सोलापूर, सांगली, पुणे व विदर्भाच्या काही भागात प्रामुख्याने आहे. द्राक्ष लागवडीखाली क्षेत्र वाढत असले तरी, लागवडी संदर्भात काही त्रुटी तशाच राहतात. द्राक्षवेलीचे आयुष्यमान हे लागवडीनंतर १२-१४ वर्षे असल्यामुळे सुरवातीसच काळजी घेणे गरजेचे असते. या पत्रिकेमध्ये लागवडी संदर्भात सविस्तर माहीती दिली आहे.

**१. जागेची निवड** - द्राक्षवेल ही जरी थंड प्रदेशातून आली असून ती समशितोष्ण वातावरणात चांगले उत्पादन देत आहे. मध्यम प्रकारचे वातावरण वेलीच्या वाढीकरीता फारच महत्वाचे असते. ज्या जमीनीत लागवड करायची आहे ती जमीन हलकी ते मध्यम प्रतीची, पाण्याचा निचरा होणारी असावी. परंतु, जमीनीच्या विपरीत परिस्थितीमध्येसुध्दा खुंटाचा वापर करून द्राक्षलागवड करता येते. शक्यतोवर व्यवस्थित निचरा न होणारी जमीन लागवडीकरीता टाळावी. द्राक्षवेलीला वाढीच्या वेगवेगळ्या अवस्थेत पाण्याची गरज वेगवेगळी असते. तेव्हा आपल्या बागेत कमीतकमी १८,००० लिटर प्रति एकर प्रति दिवस पाण्याची उपलब्धता असेल याची खात्री करून घ्यावी.

**२. जमीनीची पूर्व तयारी व चारी घेणे** - सुरवातीला शेतात असलेल्या बहुवर्षीय (लव्हाळा, हराळी, इ.) गवताचा नायनाट करणे फारच महत्वाचे होते. त्याकरीता सुरवातीच्या काळातच शिफारशी प्रमाणे तणनाशकाची फवारणी करून नियंत्रण ठेवावे.

शेतातील प्लॉटच्या लांबी व रूंदीनुसार तसेच जमीनीच्या पोतानुसार ले-आऊट ठरवणे फायद्याचे होते. शक्यतो लागवडीची दिशा उत्तर-दक्षिण असावी. ओलांड्याची दिशा सुध्दा तिच असावी. वेलीने सुर्यप्रकाशाचा पुरेपुर फायदा घेण्याकरीता ओलांड्याची दिशा उत्तर-दक्षिण असणे महत्वाचे असते. या गोष्टी Y वळण पध्दतीत महत्वाच्या असतात तर मांडव पध्दतीमध्ये कॅनॉपी ही पसरट राहील्यामुळे दिशा तेवढी महत्वाची नसते.



चारी घेण्यापूर्वी ले-आऊट तयार करणे



चारी घेणे

लागवडीचे अंतर हे वेलीच्या वाढीचा जोम व वेलीचा प्रकार (वाईन व टेबल ग्रेप्स), जमीनीचा प्रकार व तेथील वातावरणावर अवलंबून असते.

| मातीचा प्रकार | मध्यम प्रकारचे वातावरण | | कोरडे वातावरण | |
|---|---|---|---|---|
| | टेबल ग्रेप्स | वाईन ग्रेप्स | टेबल ग्रेप्स | वाईन ग्रेप्स |
| भारी जमीन | १०' x ६' | ८' x ५' | ८' x ५' | ८' x ४' |
| मध्यम प्रकारची जमीन | ९' x ६' | ८' x ४' | ८' x ५' | ८' x ३' |
| हलकी जमीन | ९' x ५' | ६' x ४' | ८' x ४' | ६' x ३' |

द्राक्षबागेत अंतरमशागत सहजरित्या करता यावी याकरीता ओळीची लांबी ही २०० फुटापर्यंत ठेवावी व त्यानुसार ब्लॉक्स तयार करावे.

लागवडीपूर्वी २ फूट रूंद व २ फूट खोल अशी चारी घेणे गरजेचे असते. त्यामुळे कधीही उपयोगात न आलेली माती लागवडीनंतर वापरात येऊन वेलीची वाढ होण्यास फायदा होतो. चारीमध्ये पाणी धरून राहून तसेच मुळांचा विकास चांगला व्हावा याकरीता शेणखत, ताग, धेंचा इ. हिरवळीची खते वापरावी.

**3. वळण पध्दतीचा वापर**

- वळण पध्दतीचा वापर हा द्राक्षजातीचा वाढीचा जोम, बागेतील तसेच सभोवतालचे वातावरण व आधुनिक पध्दतीची शेती यावर अवलंबून असते.
- वाढीचा जोम व क्षेत्र जास्त असल्यास आधुनिक पध्दतीचा वापर करण्याकरीता विस्तारीत वाय पध्दतीचा वापर करणे फायद्याचे असते. या पध्दतीमध्ये अंतरमशागतीची कामे यांत्रिकीकरणाने करणे सोपे जाते.
- फळछाटणीनंतर थिनींग आणि डिपींग ही अती महत्वाची कामे समजली जातात. संजीवकांचा वापर चांगल्या वळण पध्दतीत सहजरित्या करता येतो व त्यामुळे कामाची कार्यक्षमता वाढते. त्याचप्रमाणे केवडा सारख्या रोगांचा प्रादुर्भाव विस्तारीत वाय पध्दतीत कमी होतो.
- वाईन द्राक्षजातीमध्ये वेलीच्या वाढीचा जोम कमी असतो तसेच चांगल्या प्रतीचे मद्य तयार करण्याकरीता वेलीवर कमीतकमी घडाचे वजन ठेवण्याची शिफारस करण्यात येते. तेव्हा, 'मीनी वाय', निफीन किंवा 'टी' पध्दतीचा वापर फायद्याचा ठरतो.



विस्तारीत वाय पध्दत

**४. ड्रिपलाईनचा वापर**

- बागेत पाणी दिल्यानंतर जमीनीमध्ये सरळ व आडवे पाणी पसरेल अशाप्रकारचे नियोजन ड्रिपलाईनचा वापर करताना करावे.
- वेलीच्या मुळांच्या विस्तारातील भागामध्ये एकसारखे पाणी पसरण्याकरीता कमी डिस्चार्जचे जास्त वेळेकरीता चलन असलेले इमीटर्सचा वापर फायद्याचा ठरतो.
- गरजेप्रमाणे वेलीला पाणी मिळण्याकरीता १ कि.ग्रॅ./सेंमी.$^2$ दाबाचे पाणी देण्याची त्या बागेत सुविधा असावी.
- ड्रिप इरिगेशनच्या नळ्या तारेला जागोजागी बांधून घ्याव्यात. यामुळे नळी एका सरळ रेषेत राहील व सॅगींग होणार नाही.
- बागेत पाण्यात विरघळणारी खते वापरण्याकरीता या संचासोबत व्हेंचुरी जोडता येईल अशी सुविधा असावी.
- ड्रिपर तसेच ड्रिपलाईन वेळोवेळी साफ केल्यास त्यामधील असलेले क्षार व मातीचे कण निघून एकसारख्या दाबाचे पाणी वेलीला मिळण्यास मदत होईल.

**५. द्राक्षजातीची व खुटांची निवड**

द्राक्षजातीची व खुटांची निवड ही आपल्या लागवडीचा उद्देश, बाजारपेठेची गरज व त्या भागातील वातावरणाचा विचार करून करावी. द्राक्षजाती खालीलप्रमाणे -

**खाण्याची द्राक्षे -** थॉमसन सिडलेस, तास-ए-गणेश, सोनाका, माणिक चमन, इ.

**बेदाणा निर्मितीची द्राक्षे -** थॉमसन सिडलेस व त्याचे क्लोन्स, मोनुक्का, केआर-व्हाईट, इ.

**मद्य निर्मितीची द्राक्षे - सफेद** : शेनिन ब्लॉ, सॉव्हीग्नॉन ब्लॉ, चारडोनी
**रंगीन** : कॅबरनेट सॉव्हीग्नॉन, इ.

**खुंटाचा वापर खालीलप्रमाणे**

**डॉगरीज -** क्षार व कमी पाणी

**११० आर -** क्षार, कमी पाणी व बाकीचे साधारण अडचणीवर

**रामसे - क्षार**

याव्यतिरिक्त द्राक्ष संशोधन केंद्रात ११०३-P, SO4, १४० RU, फ्रिडम, ९९ आर, इ. खुंटावर प्रयोग सुरू आहेत.